**नि. फौ. खटला क्र.४९३/२०१९**
**सरकार वि. प्रसाद कंगारळकर**
**निशाणी क्र. २१**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३.

देवा शपथ खरे सांगतो की,

माझे नाव :— राजाराम रानबा पाटील,
वय : ६३ वर्षे, धंदा — सेवानिवृत्त,
हल्ली मुक्काम रा.फलॅट नं.२०१, प्रज्वल आयकोन, नेहरूनगर, पिंपरी, पुणे

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. जी.एम. बारगजे</u>**

**१.** फिर्यादी कोमल ही माझी मुलगी आहे. तिचे लग्न दि. ०४.०२.२०१४ रोजी आरोपी यांचेसोबत बेळगाव, कर्नाटक येथे पारंपारिक पध्दतीने झाले होते. लग्नाच्यावेळी आरोपीला रू.१०,०००/— रोख, साडेपाच तोळे सोने दिले होते. तसेच मी तिच्या लग्नामध्ये ५ ते ६ लाख रूपये खर्च केला होता. माझी मुलगी लग्नापुर्वी इटन टेक्नालॉजी, भोसरी येथे काम करत होती. लग्नानंतर केशवनगर, चिंचवड येथे दोघांनीही भाडयाने फलॅट घेवुन तेथे राहत होते. थोडे दिवस ५ ते ६ महिने आरोपी हे तिचे सोबत व्यवस्थित वागत होते. परंतु त्यानंतर ती नोकरी करत असल्यामुळे घरातील संपुर्ण खर्च करून, तीच घर चालवायची. परंतु आरोपी हा तिला म्हणायचा की, तु तुझे आईवडिलांना सर्व पैसा देते. आरोपी हा तिला शिवीगाळ करून मारहाण करायचा. ती बाब माझी मुलगी मला व माझे पत्नीला फोन करून सांगायची. त्यावरून तिला आम्ही समजावायचे की, संसारामध्ये या गोष्टी चालत असतात. आरोपी हा मला भिकारी म्हणुन हाक मारायचा

**२.** एका प्रसंगी आरोपी यांच्या भावाचा लग्नाचा वाढदिवस बेळगाव येथे असताना त्या कार्यक्रमाला आरोपीच्या भावाच्या पत्नीचा मित्र फोटो शुटींग करत होता. माझे मुलीला त्यावेळेस वाटले की, तिने देखील तिच्या पतीसोबत फोटो काढावा. त्यामुळे तिने तिच्या पतीला फोटो काढायला या अशी विनंती केली होती.

**३.** ती व तिचे पती पुणे येथे परत आल्यानंतर एकेदिवशी रात्री १२.३० वाजताचे सुमारास आरोपीने त्या फोटोग्राफरसोबत तिचे अनैतिक संबंध आहेत म्हणुन

तिला मारहाण केली व मुलासोबत तिला घराबाहेर काढले होते. त्यावेळेस माझा नातु सव्वा वर्षाचा होता. त्याच रात्री आरोपी हा माझे घरी आला व म्हणाला की, तुमच्या मुलीला नातवासोबत घराबाहेर काढलेले आहे व तुम्ही तिला घेवुन जा व तिचे काही बरेवाईट झालेतर मी जबाबदार राहणार नाही. त्या घटनेवरून माझे नातवाने धस्का घेतला व आजारी पडला. त्याला काळेवाडी येथील हॉस्पीटलमध्ये भरती करावे लागले होते. ती बाब आम्ही आरोपीला फोन करून सांगितली होते की, त्याला ॲडमिट केले आहे, भेटायला या. परंतु तो आला नाही.

४. त्यापुर्वी आरोपी व त्याची आई सतत माझे मुलीला म्हणायचे की, तुझे आईवडिलाकडुन गाडी घेण्याकरिता पैसे घेवुन ये. त्या व्यतिरिक्त आरोपी हा तिच्यावर आरोप लावायचा की, त्याच्या मित्राशी तिचे अनैतिक संबंध आहेत.

५. माझी मुलगी गरोदर असताना तिचे डोहाळे जेवण पिंपरी येथील एका हॉलमध्ये केले होते. त्या कार्यक्रमामध्ये आरोपी व त्याची आई यांनी माझे मुलीला धक्काबुक्की शिवीगाळ केली की, त्यांचा मानपान व्यवस्थित करण्यात आलेला नाही.

६. माझी मुलगी तिच्या ऑफीसमध्ये गेली तर आरोपी हा तिला सतत फोन करायचा व तिला घाणेरडे मॅसेज पाठवायचा. मी न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपीला ओळखतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे स्वत:</u>**

७. जे लग्नामध्ये माझे मुलीला साडेपाच तोळे सोने दिले होते, त्याचा तपशिल व बिल पोलिसांना दिले नव्हते. केशवनगर, चिंचवड येथील भाडयाचे घर त्या दोघांनी लग्नाचा साखरपुडा झाल्यानंतर घेतला होता. त्याचे डिपॉजिट माझी मुलगी कोमल हिने दिले होते. हे मी सांगु शकत नाही की, त्याचे डिपॉजिट किती व कशाप्रकारे घर मालकाला दिले होते.

प्रश्न — ते रू. ३०,०००/— डिपॉजिट चेकद्वारे आरोपीने दिले होते?
उत्तर — माझे मुलीकडुन ती रक्कम घेवुन आरोपीने ती रक्कम चेकद्वारे डिपॉजिट दिली होती.

८. ती रक्कम माझे मुलीने आरोपीला रोख स्वरूपात दिली होती. हे मला माहित नाही की, कोणत्या तारखेला फिर्यादीने आरोपीला रोख स्वरूपात दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुलीची एलआयसी पॉलिसी होती. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, तिच्या लग्नापुर्वीच तिने ती पॉलीसी काढली होती. हे मी सांगु शकत नाही की, सन २०१४—२०१५ या कालावधीमध्ये ते एलआयसीची प्रिमिअम आरोपी भरायचा.

९. माझे देखील एलआयीसीची पॉलिसी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा एक प्रिमिअम आरोपीने भरला होता. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्यावेळेसे मी रू. १,००,०००/— आरोपीकडुन लग्नाकरिता घेतली होती. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, माझी मुलीची इच्छा होती की, तिने तिच्या लग्नामध्ये स्वत: खर्च करावा, त्यामुळे आम्ही दोन — तीन बॅकेमध्ये लोन मिळावा म्हणुन विचारपुस केली होती. परंतु आरोपी स्वत: म्हटला की, त्याच्या ऑफीसमधुन कमी दरामध्ये लोन मिळणार. त्यामुळे त्याने ती रक्कम लोनद्वारे काढली होती. परंतु मी व्याजासकट चार दिवसात आरोपीने त्या रक्कमेची परत मागणी केली असता परत धनादेशाद्वारे केली होती. त्या संदर्भात माझेकडे बॅकेचे विवरण पत्र आहे. ते मी दाखल करू शकतो.

१०. ज्यावेळेस फिर्यादी व आरोपीमध्ये वाद व्हायचे आरोपी हा मला भिकारी म्हणुन संबोधित करायचा. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, एकदा आरोपी हा घरी आला होता, त्यावेळेस त्याने म्हटले होते की, ए भिका—या मला गाडी घ्यायची आहे, पैसे दे. त्यावेळेस घरातील सदस्य ज्यामध्ये माझी पत्नीदेखील हजर होती.

त्यावेळेस आरोपीकडे चारचाकी गाडी नव्हती. ती घटना सन २०१५–२०१६ या वर्षाची आहे. ती तारीख मला आता आठवत नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या भावाच्या लग्नाच्या वाढदिवसाला मी बेळगाव येथे गेलो नव्हतो. त्यादिवशीच्या घटनेबद्दल मला माझे मुलीने सांगितले होते.

**१२.** रात्री १२.३० वाजतेची घटना दि. २८.०५.२०१७ रोजी घडली होती. आता मला आठवत नाही की, माझे नातवाला कोणत्या तारखेला रूग्णालयात भरती करण्यात आले होते. हे मला माहित नाही की, मी त्या संदर्भात रूग्णालयाचे दस्तऐवज पोलिसांना दिले होत काय. हे मला माहित नाही की, माझे मुलीने त्या रूग्णालयाचे दस्तवेज पोलिसांना दिले होते काय.

**१३.** माझी मुलगी फिर्यादी हिने आरोपीला कॉल करून मुलगा आजारी आहे व हॉस्पीटलमध्ये भरती आहे, ही बाब सांगितली होती. त्यावेळेस आरोपी हा पुण्यामध्ये होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आरोपी हा सत्यम वेंचुर, हैद्राबाद येथे कामाला होता.

**१४.** रात्री १२.०० वाजता मी माझे मुलीला घ्यायला गेलो होतो. आरोपी हा त्यादिवशी दुचाकी वाहनाने माझेकडे आला होतो. हे मला माहित नाही की, आरोपीची दुचाकी वाहनाचा क्र. के ०३/७०३६ असा होता.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासुन नातु माझेकडेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, जुन २०१८ मध्ये नातु आजारी पडला होता, त्यामुळे त्याला रूग्णालयात भरती करण्यात आले होते.

**नि. फौ. खटला क्र.४९३/२०१९**
**सरकार वि. प्रसाद कंगारळकर**
**निशाणी क्र. २१**

**१६.** माझे मुलीला आरोपी हा धक्काबुक्की करून मारहाण करायचा, त्या घटनेबद्‌दल मी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली नव्हती किंवा तिला डॉक्टर यांचेकडे उपचाराकरिता घेवुन गेलो नव्हतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, रात्री १२.०० वाजताची घटना झाल्यानंतर माझे मुलीची कपडे फाडण्यात आले होते व तिच्या गळयावर नखाने जखम झाली होती. त्याबद्‌दल मी माझे पत्नीला म्हटले होते की, पोलिस स्टेशनला त्याबद्‌दल तक्रार करू. परंतु माझे पत्नीने मला विनंती केली की, मुलीचा संसार वाचवायचा आहे, त्यामुळे फिर्याद दयायला नको. त्यादिवशी १२.०० वाजता आरोपीने मला फोन केला होता. तो कॉल मला प्राप्त झाला होता, त्याचा मोबाईल क्रमांक मला आता आठवत नाही.

**१७.** त्यावेळेस मी माझे मुलीला घ्यायला माझे दुचाकी क्र. एमएच१४/डीव्ही–४४९४ या वाहनाने गेलो होतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/—
(एन.आर.गजभिये)
सह न्यायदंडाधिकारी(प्र.श्रे.), पिंपरी, पुणे.

दिनांक : ०८/०४/२०२४